साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–ग्यानीराम अडकू ब्राम्हणकर
वय:–६३ वर्ष, व्यवसाय–शेतमजुरी
राह.सालेभट्टी, ता.भिवापूर, जि.नागपूर.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. पोलिसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलविले होते व मला समन्सपत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर बरोबर आहे त्यास **निशानी क्र.१७** देण्यात आला. मी घटनास्थळावर गेलो होतो. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.१८** देण्यात आला. घटनास्थळ पंचनामा हा झगड्यासंबंधीचा होता व माझ्यासमक्ष एक काडी जप्त केली होती. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो आहे त्यास यापुर्वीच **आर्टीकल अ** देण्यात आलेला आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे श्री. आर.बी.भोंबे यांच्यामार्फत उलटतपास सुरू</u>**

२. राहुल मेंढूले हे माझ्या चांगल्या ओळखीचे आहे. मला कोणत्या पोलिसांनी सुचनापत्र दिले त्यांचे नाव सांगता येत नाही. पोलिसांनी सुचनापत्र देतेवेळी गुन्हा र.नं. व कोणत्या कलमाखाली गुन्हा नोंद आहे याबाबत सांगितले नव्हते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, झगड्याबाबत सांगितले होते. पोलिसांनी मला सदर सुचनापत्रामध्ये घटनास्थळावर किती वाजता व कोणत्या तारखेला हजर राहायचे व कोठे हजर राहायचे याबाबत सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला फिर्यादीने बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा मी जाण्यापुर्वीच तयार होता. घटनास्थळ पंचनामा निश्चीत किती वाजता सुरू केला व किती वाजता संपला याबाबत मला सांगता येत नाही. घटनास्थळाच्या आजुबाजुला नवनाथ यांचे घर आहे व इतर कोणाची घरे आहे त्यांची नावे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळावर गेलोच नाही त्यामुळे घटनास्थळाच्या

आजुबाजुला घरे असलेल्या लोकांची नावे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळ पंचनाम्यावरील सह्या मी राहूल यांच्या घरी बसुनच केल्या. हे म्हणणे खरे नाही की,माझ्यासमक्ष कोणताही घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही व कोणतीही काठी जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, राहूल मेंढूले माझ्या ओळखीचा असल्यामुळे त्याच्या सांगण्यावरून मी पंचनाम्यावर सह्या केल्या व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा.

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि१२/०६/२०२५

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड